दिनांक २९/०७/२०२१

<u>प्रेस नोट</u>

**जिल्हा परिषद लातुर यांत्रीकी उपविभागातील शाखा अभियंता ज्ञानदेव प्रल्हादराव सुडे यांनी कामाची मोजपुस्तीका (एम.बी.) व बिल मंजुर करण्यासाठी ४०,०००/–रूपयाची लाच मागीतली म्हणुन त्यांच्या विरूध्द गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांनी त्यांच्या गावातील जुन्या बोअरवेल मध्ये बसवलेल्या नविन पाच इलेक्ट्रीक मोटारींच्या बिलाची मोजपुस्तीका (एम.बी.) करण्यासाठी व प्रलंबित असलेले ७,४०,०००/– रू बिल मंजुर करण्यासाठी ज्ञानदेव प्रल्हादराव सुडे, पद–शाखा अभियंता, नेमणुक–उपअभियंता यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, लातुर यांनी ६०,०००/– ते ६५,०००/– रूपये लाचेची मागणी केल्या बाबतची तक्रार दिनांक २७/०७/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या कडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक २७/०७/२०२१ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांनी जुन्या बोअरवेल मध्ये बसवलेल्या नविन पाच इलेक्ट्रीक मोटारीच्या कामाचे बिलाची मोजपुस्तीका (एम.बी.) करण्यासाठी व प्रलंबित असलेले ७,४०,०००/– रू बिल मंजुर करण्यासाठी शाखा अभियंता ज्ञानदेव प्रल्हादराव सुडे यांनी तडजोडीअंती ४०,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदार सदर लाचेची रक्कम ४०,०००/–रुपये आलोसे यांना दिनांक २७/०७/२०२१ रोजी देण्याकरीता उपअभियंता यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, लातुर येथे गेले असता शाखा अभियंता ज्ञानदेव प्रल्हादराव सुडे यांनी लाच घेण्याचे जाणुन बुजून टाळले आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर, लातुर येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, सपोउपनि/ संजय पस्तापुरे, पोह/रमाकांत चाटे, पोना/संतोष गिरी, मपोना/शिवकांता शेळके, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोकॉ/रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– मोबाईल क्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२३८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर